**नियमित दिवाणी दावा क्र. ३४९/२०१६**
**निशाणी क्र.७८ लगत**

**<u>पुढील उलटतपास प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.डी.व्ही.जोशी यांचे मार्फत</u>**

**<u>सुरु</u> :-**

वादीने दाव्यासोबत दाखल केलेल्या नकाशाप्रमाणे मला जागेवर वस्तुस्थिती आढळली नाही. मोजणीनंतर मी पंचनामा केला होता. पंचनाम्यावर प्रतिवादींच्या सहया नाहीत. प्रतिवादी हजर नाहीत किंवा हजर असुनही सहया करत नाहीत अशा आशयाचा पंचनामा मी केला नाही. ब शिट पाहुन गट क्र.२७२ व २७३ किती पोट हिस्से पडलेले आहेत ही बाब मला सांगता येणार नाही. ब शिट पाहुन गट क्र.२७३ चे सातबारा उता-याप्रमाणे क्षेत्रफळ सांगता येईल परंतु गट क्रमांक २७२ चे क्षेत्रफळ सांगता येणार नाही. मोजणीकरण्यापुर्वी गट क्रमांक २७३ चा सातबारा उतारा मी पाहिलेला होता. गट क्रमांक २७३ चे सातबारा उता-याप्रमाणे भानुदास किसन खर्डे, किसन निवृत्ती खर्डे, मिना किसन खर्डे, व समता ग्रामिण पतसंस्था असे भोगवटादार असुन त्याचे क्षेत्र १ हेक्टर २१ आर असे आहे. सातबारा उता-याप्रमाणे किसन निवृत्ती खर्डे याच्या नावापुढे कंस झालेला असुन तो भोगवटादार नाही अथवा मालक नाही. भानुदास, मिना व समता ग्रामीण पतसंस्था यांचे स्वतंत्र क्षेत्र किती आहे ही बाब ब शिटवरून सांगता येत नाही. गट क्रमांक २७३ वरील भानुदास, मिना व समता ग्रामिण पतसंस्था यांचे ताब्यातील क्षेत्र स्वतंत्ररीत्या मी मोजलेले नाही, एकत्र मोजलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ब शिटवरून वर नमुद तिघांचे स्वतंत्र क्षेत्रफळ सांगता येत नाही. गट क्रमांक २७२ मी मोजलेला नाही. गट क्रमांक २७२ चा सातबारा उतारा मी पाहिलेला नव्हता. सुवर्णा, मिराबाई, मिठाबाई हे गट क्रमांक २७२ च्या प्रतिवादीपणात सामील आहेत. गट क्रमांक २८४ चा उतारा मी पाहिलेला नाही. गट क्रमांक २७१ चा उतारा मी पाहिलेला नाही. बाबासाहेब भागवत खर्डे, चंद्रकला बाबासाहेब खर्डे, गणेश बाबासाहेब खर्डे, संदिप बाबासाहेब खर्डे यांना मोजणीपुर्व नोटीसांचे रेकॉर्ड दिसत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.०१ ते ०४ यांच्या नोटीसांचे व पोचपावत्यांचे रेकॉर्ड नाही. मोजणीकामी जाताना न्यायालयाचा आदेश सोबत नेला होता. गट क्रमांक २७३ चा भुमी अभिलेख कार्यालयाचा नकाशा मोजणीकामी नेला होता. गट क्रमांक २७३ चा भुमी अभिलेख कार्यालयाचा फाळणी नकाशा मोजणीकामी नेला नव्हता. भुमी अभिलेख कार्यालयाचा नकाशा पाहुन गट क्रमांक २७३ चा पुर्वीचा सर्व्हे क्रमांक २२८ होता असे सांगता

येईल. सर्व्हे क्रमांक २२८ चा एक गट तयार झाला. सर्व्हे क्रमांक २२८/३ ब व सर्व्हे कमांक २२८/३ब + २ब/२ असे हिस्से पडले. हे दोन हिस्से मिळुन तीन एकर क्षेत्र आहे. निशाणी क्र.२९ सोबत दाखल नकाशाची साक्षांकित प्रत बरोबर आहे. त्यावरील शिक्का मी ओळखतो. त्यातील गटक्रमांक अभिलेखाप्रमाणे बरोबर आहेत. त्यास **निशाणी कमांक ८३** देण्यात येते. सर्व्हे क्रमांक २२८ चा नकाशा मी स्वत: तयार करुन अहवालासोबत दाखल केलेला आहे. त्यावर माझी सही असुन नकाशा बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.८४** देण्यात येते. मोजणी नकाशामध्ये दाखविलेल्या निळया रंगामध्ये दाखविलेल्या क्षेत्रामध्ये प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०४ यांची वहिवाट आहे. निळया रंगामध्ये रेघांनी दर्शविलेल्या चौकानातील घर प्रतिवादीचे आहे. ब नकाशात लाल रंगाने दाखविलेले क्षेत्र गट क्रमांक २७४ प्रतिवादीचे असुन त्यामध्ये वादी क्रमांक ०१ ते ०३ ची वहिवाट आहे. एकुण क्षेत्र ०.३८ आर इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, ब नकाशामध्ये गट क्रमांक २७३ व गट क्रमांक २७४ मधील लाल व निळया रंगाने दर्शविलेले क्षेत्र हे केवळ वहिवाटीचे क्षेत्र दाखविलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ब नकाशामध्ये कोणी कोणाच्या क्षेत्रावर अतिक्रमण केले याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे मॅन्युअल प्रमाणे मोजणी करताना चार बाजुंना ओ एन असा उल्लेख करावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, ब नकाशामध्ये गट क्रमांक २७३ व २७४ च्या चारही बाजु दर्शविण्यासाठी ओ एन अशी अक्षरे कुठेही लिहीलेली नाहीत. गट क्रमांक २७४ ची शिवेपर्यंत नाही. गट क्रमांक २७३ हि त्याच्या पुर्वेला असलेल्या शिवेपर्यंत आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक २७३ च्या पुर्वेला जो रस्ता लागुन आहे तिथे प्रतिवादीचे घर आहे. नकाशामध्ये दाखविलेल्या वस्तीचे क्षेत्रफळ २ आर इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक २७३ हा सर्व्हे क्रमांक २२८/३ब व ३अ + २ब/२ चा मिळुन झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाचे आदेशाप्रमाणे मी मोजणीचे काम केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्यक्ष जागेवर जावुन गट क्रमांक २७३ व २७४ ची मोजणी केलेली नाही. हे म्हणणे नाही आहे की, वादीच्या एकमिलापी होवुन खोटा नकाशा देवुन खोटी मोजणी केली आहे.

उलटतपास पुर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/-
(ए. ए. कुलकर्णी)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
राहाता

दिनांक :- २५/०७/२०२४